पुढारी दि १० जून २०१८



जत : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालताना प्राचार्य मिलिंद हुजरे व त्यांचे सहकारी.

# डॉ. बापूजी साळुंखे एक व्रतस्थ शिक्षणप्रेमी : प्रा. मिलिंद हुजरे

**येळवी : वार्ताहर**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षास सुरुवात जत येथील राजे रामराव महाविद्यालयात डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले की, महामानवांच्या विचारांना आजच्या तरुणांनी क्रांतीची जोड देणे गरजेचे आहे. बापूजी साळुंखे हे एक व्रतस्थ व शिक्षणप्रेमी होते. तळागाळातील माणसांना शिक्षण मिळाल्याशिवाय सर्व समाज स्वाभिमानाने आणि स्वावलंबनाने उभा राहणार नाही, असा विचार करून त्यांनी ज्ञानदानाला वाहून घेतले. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी स्वतः ला झोकून दिले.

यानंतर विठ्ठलराव ढेकळे यांनी बापूजींच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी श्रीकांत कोकरे, प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11. 6 '18

Scanned by CamScanner

पुढारी

दि. १२/०६/२०१८

# डॉ. बापूजी साळुंखे हे ज्ञानतपस्वी होते

## डॉ.ढेकळे यांचे प्रतिपादन;जतमध्ये जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त शोभायात्रा

**येळवी : वार्ताहर**

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराबरोबरच सत्य, शिल, प्रामाणिकता व चारित्र्याचे शिक्षण देणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे ज्ञानतपस्वी होते . असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

जत येथील राजे रामराव महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाप्रसंगी आयोजित केलेल्या समारंभात ते बोलत होते. शोभा यात्रेच्या उद्‌घाटनही झाले. ही शोभायात्रा जत शहरात काढण्यात आली.



जत : डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. (छाया : विजय रुपनूर)

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार हे ब्रीद वाक्य घेऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत पोहचवली. शिक्षणाच्या माध्यमातून आपणास माणसातला माणूसपणा जागा करायचा आहे. आजच्या विज्ञान युगात हरवत चाललेली, माणुसकी जिवंत ठेवायची असेल तर सुसंस्कारित शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून सर्वांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ज्ञानगंगेचा वसा पुढे घेऊन जायचा आहे असेही ते म्हणाले.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्याहस्ते शोभायात्रेची सुरूवात झाली. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयघोषात जत शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

My Sangli Edition
12 Jun, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

13.6.18

Scanned by CamScanner

तरुण भारत
बुधवार, १३ जून २०१८

# डॉ. बापुजी साळुंखे ज्ञानतपस्वी : ढेकळे

प्रतिनिधी
जत

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराबरोबरच सत्य, शिल, प्रामाणिकता व चारित्र्याचे शिक्षण देणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे हे ज्ञानतपस्वी होते असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाप्रसंगी आयोजित केलेल्या शोभा यात्रेच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते.

शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे ब्रीद वाक्य घेवून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत पोहचवली असे सांगून डॉ. व्ही. एस. ढेकळे पुढे म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी यांच्या दारापर्यंत शिक्षण पोहचविल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. म्हणून डॉ. बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागात जाऊन संस्थेच्या शाखा उघडून शिक्षणाची सोय केली. शिक्षणाच्या माध्यमातून आपणास माणसातला माणूसपणा जागा करायचा आहे. आजच्या विज्ञान युगात हरवत चाललेली माणुसकी जिवंत ठेवायची असेत तर सुसंस्कारित शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून आपण सर्वांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ज्ञानगंगेचा वसा पुढे घेऊन जायचा आहे असेही ते शेवटी म्हणाले.

प्रारंभी राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलींद हुजरे यांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाप्रसंगी आयोजित शोभायात्रेचे उद्‌घाटन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी या सर्वांनी मिळून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जघोषात जत शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांचा गजर आणि लेझीम पथक या भव्य शोभायात्रेचे लक्ष वेधून घेत होते. प्रशासकीय कर्मचारी यांनी लेझीम खेळून शोभा वाढवली.

14.6.18

Scanned by CamScanner

दै. तरुण भारत





# योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा : डॉ. ढेकळे

जत : प्रतिनिधी

योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून योगासने केल्याने शरीर-मन व बुद्धी यांचा त्रिवेणी संगम होऊन जीवन निरोगी व आनंदमय बनते असे प्रतिपादन डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी केले.

राजे रामराव महाविद्यालय, जत येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एन.सी.सी.व एन.एस.एस. यांच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी १६ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार पी.एस.पाटील, बाहुबली निटवे, पी.ए.सावंत, अमोल काकासकर उपस्थित होते. सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये निरामय आणि निर्मळ जीवनासाठी योग महत्वाचा आहे असे सांगून डॉ.व्ही.एस.ढेकळे पुढे म्हणाले कि, योगामुळे होणारे फायदे आज जगाने मान्य केले आहे. असाध्य शारीरिक रोगापासून मुक्ति मिळविण्यासाठी योग अभ्यास महत्वाचा आहे. पण आपणास ही देणगी आपल्या संस्कृतीने प्राचीन काळापासून आपणास दिली आहे त्याचा अभ्यास करून आपण आपले शरीर व मन निरोगी केले पाहिजे. योगादिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात एन.सी.सी.व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रारंभी योगगुरू श्री बाहुबली निटवे यांनी सुर्यनमस्काराचे धडे देऊन वेगवेगळ्या प्रकारच्या योगासनांचा सराव करून घेतला. नियोजन पी. ए. सावंत, प्रा.राजेंद्र लवटे यांनी केले.

## जत मध्ये शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळूंखे यांचा जन्मशताब्दी निमित्त राजे रामराव महाविद्यालयाच्या वतीने शोभा यात्रा

जत (निलेश माने)- शिक्षणमहर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळूंखे यांचा जन्मशताब्दी निमित्त जत मध्ये राजे रामराव महाविद्यालयाच्या वतीने जत शहरातून शोभा यात्रा काढण्यात आली या शोभा यात्रेमध्ये लेझीम पथक व ढोल ताशे होते .शोभा यात्रेची सुरवात महाविद्यालयातून झाली जत शहरातील प्रमुख मार्गावरून शोभा यात्रा नेली.



यावेळी रॅली मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे, डॉ. विठ्ठलराव ढेकळे, पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ श्रीकांत कोकरे, डॉ शिवाजी कुलाल, शिवाजी कोळेकरमामा, दानोबा कराडे, पांडुरंग सावंत व परिसरातील सर्व ग्रामस्थ तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. बापूजी साळूंखे यांच्या प्रतिमेचे शहरातून भव्य मिरवणूक काढून मानवंदना देण्यात आली

25-6-18

Scanned by CamScanner

विजयवाणी

२४ जून २०१८

# डॉ. बापूजी साळुंखे हे ज्ञानतपस्वी होते : डॉ. व्ही. एस. ढेकळे

जत (प्रतिनिधी) : ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराबरोबरच सत्य, शिल, प्रामाणिकता व चारित्र्याचे शिक्षण देणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे ज्ञानतपस्वी होते असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाप्रसंगी आयोजित केलेल्या शोभा यात्रेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार हे ब्रीद वाक्य घेऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत पोहचवली असे सांगून डॉ. व्ही. एस. ढेकळे पुढे म्हणाले कि, शेतकरी, कष्टकरी यांच्या दारापर्यंत शिक्षण पोहचविल्याशिवाय सामाज्याची प्रगती होणार नाही म्हणून डॉ. बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागात जाऊन संस्थेच्या शाखा उघडून शिक्षणाची सोय केली. शिक्षणाच्या माध्यमातून आपणास माणसातला माणूसपणा जागा करायचा आहे. आजच्या विज्ञान युगात हरवत चाललेली माणुसकी जिवंत ठेवायची असेल तर सुसंस्कारित शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून आपण सर्वांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ज्ञानगंगेचा वसा पुढे घेऊन जायचा आहे असेही ते शेवटी म्हणाले.

प्रारंभी राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलींद हुजरे यांच्याहस्ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाप्रसंगी आयोजित शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी या सर्वांनी मिळून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयघोषात जत शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपारिक वाद्यांचा गजर आणि लेझीम पथक या भव्य शोभायात्रेचे लक्ष वेधून घेत होते. प्राध्यापक, विद्यार्थी–विद्यार्थिनी व प्रशासकीय कर्मचारी यांनी लेझीम खेळून मिरवणुकीची शोभा वाढवली.

25-6-18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
सोमवार ता. २५ जून २०१८

# योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे

जत, (प्रतिनिधी): योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून योगासने केल्याने शरीर-मन व बुद्धी यांचा त्रिवेणी संगम होऊन जीवन निरोगी व आनंदमय बनते असे प्रतिपादन डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एन.सी.सी.व एन.एस.एस. यांच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी १६ महाराष्ट्र बटालियन चे हवालदार श्री.पी.एस.पाटील, योगगुरू म्हणून श्री.बाहुबली निटवे सर, महाविद्यालय



जत, येथील राजे रामराव महाविद्यालयात योगदिनी योगासने सादर करताना मान्यवर

एन.सी.सी. लेप्टनंट पी.ए. सावंत, एस.आर.व्ही. एम.एन. सी.सी. प्रमुख अमोल कळसकर हे उपस्थित होते. नियमित सूर्यनमस्कार केल्याने शरीर तर निरोगी बातेच पण त्याच बरोबर मनदेखील निरोगी बनते. सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये निरामय आणि निर्मळ जीवनासाठी योग महत्वाचा आहे असे सांगून डॉ.व्ही.एस.ढेकळे पुढे म्हणाले कि, योगामुळे होणारे फायदे आज जगणे मान्य केले आहे. असाध्य शारीरिक रोगापासून मुक्ती मिळविण्यासाठी योग आभ्यास महत्वाचा आहे. पण आपणास ही देणगी आपल्या संस्कृतीने प्राचीन काळापासून आपणास दिली आहे. त्याचा आभ्यास करून आपण आपले शरीर व मन निरोगी केले पाहिजे असेही डॉ.व्ही.एस.ढेकळे शेवटी

(पान ३ वर)

26.6.18

योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे

म्हणाले. योगादिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात एन.सी.सी.व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रारंभी योगगुरू बाहुबली निटवे यांनी सुर्यनमस्काराचे धडे देऊन वेगवेगळ्या प्रकारच्या योगासनांचा सराव करून घेतला व योगासनाचे महत्व पटवून दिले. या आंतरराष्ट्रीय योग दिन शिबिराचे नियोजन एन.सी.सी. लेप्टनंट पी.ए. सावंत व एन.एस.एस. प्रकल्प अधिकारी प्रा.राजेंद्र लवटे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

Scanned by CamScanner

पुढारी | सांगली, गुरुवार २८ जून २०१८



जत : राजे रामराव महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमा पूजनप्रसंगी डॉ. व्ही. एस. ढेकळे, आर. बी. पाटील आदी.

# राजे रामराव महाविद्यालयात शाहू महाराज जयंती

**येळवी (वार्ताहर) :** जत येथील राजे रामराव महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक आर.बी. पाटील यांनी केले. सी. वाय. माने-पाटील, श्रीमंत ठोंबरे, सिद्राम चव्हाण, श्रीकांत कोकरे, डॉ. भीमाशंकर डहाके उपस्थित होते. प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी आभार मानले.

29.6.18

Scanned by CamScanner

शुक्रवार ता. २९ जून २०१८

तरुण भारत

# राजे रामराव महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



राजे रामराव महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जंयती साजरी करण्यात आली.

जत,(प्रतिनिधी):राजर्षी शाहू महाराज हे सर्वसामान्य, कष्टकरी, शेतकरी, व सामान्य जनतेला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दिन- दलित, गोर गरीब, बहुजन समाजासाठी अर्पण केले म्हणून ते राजर्षी झाले असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. प्रारंभी डॉ.ढेकळे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाला आणि कर्तुत्वाला अनेक पैलू होते. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी क्रांतिकारक कार्य केले. बहुजन समाजासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा मूलमंत्र सर्वसामान्यांमध्ये रुजविला असेही शेवटी डॉ.ढेकळे म्हणाले, प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.आर.बी.पाटील यांनी केले.यावेळी प्रा.सी.वाय. मानेपाटील,प्रा.श्रीमंत ठोंबरे, प्रा.सिद्राम चव्हाण,प्रा.श्रीकांत कोकरे,प्रा.डॉ.भिमाशंकर डहाके उपस्थित होते.आभार प्रा.सौ. एन.व्ही.मोरे यांनी मानले.

मुंबई – कोकण पदवीधर मतदार संघात प्रथमच भाजप आणि शिवसेना आमने-सामने आली आहे. तर या ठिकाणी राष्ट्रवादीची कसोटी लागली आहे. कारण या ठिकाणी राष्ट्रवादीचा उमेदवार विजयी होत आलाय. मात्र, प्रथमच भाजप या निवडणूक आखाड्यात उतरल्याने चुरस निर्माण झालेय. येथे शिवसेना आणि भाजप यांच्यात जोरदार चुरस पाहायला मिळत आहे. शिवसेने आघाडी घेतली असली तरी भाजपने जोरदार टक्कर दिल्याचे पाहायला मिळत आहे.

30.6.18

Scanned by CamScanner

शुक्रवार, २९ जून २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात शाहू महाराज जयंती

**जत :** राजर्षी शाहू महाराज हे सर्वसामान्य, कष्टकरी, शेतकरी व सामान्य जनतेला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य दिन दलित, गोर गरीब, बहुजन समाजासाठी अर्पण केले. म्हणून ते राजर्षी झाले असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे राजर्षी शाहू महाराजांच्या १४४ व्या जयंती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. प्रारंभी डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाला आणि कर्तुत्वाला पैलू होतेक्रांतीच्या या राजाचे अंत:करण आभाळाएवढे मोठे होते. प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाती प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

30. 6. 18

Scanned by CamScanner

लोकमत

सांगली, बुधवार, दि. ४ जुलै २०१८

नवनाथ गोरे : जतच्या महाविद्यालयात सत्कार; प्रकट मुलाखतीतून उलगडला प्रवास

# दुष्काळग्रस्तांचं जीणं 'फेसाटी'त मांडलं

लोकमत न्यूज नेटवर्क



बिळूर : विद्यापीठात शिकत असताना अनेक पुस्तके वाचत गेलो. त्या पुस्तकात मांडलेले जग हे आपलेच आहे. आपणही जे जगलो, जे भोगले ते मांडले पाहिजे. आपले दुष्काळी भागातील जगणे साहित्यात आले पाहिजे, या भूमिकेतूनच लिहित गेलो आणि त्यातूनच 'फेसाटी'चा जन्म झाला, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक नवनाथ गोरे यांनी केले.

येथील राजे रामराव महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त नवनाथ गोरे व बालभारतीच्या आठवी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंद्र ऐनापुरे या दोघांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी प्रा. गोरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. याप्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक विक्रम सावंत, जि. प. सदस्य सरदार पाटील, रा. स. प. अध्यक्ष अजित पाटील, मराठी-कन्नड साहित्य परिषदेचे डॉ. रवींद्र आरळी, डॉ. श्रीपाद जोशी उपस्थित होते.

## जत तालुक्याच्या वैभवात भर

डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, जीवनामध्ये अनेक संकटे येतात. त्या संकटांशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य पुस्तकामध्ये असते. विचारांची एकरूपता आणि सामाजिक संवेदनशीलता एकत्र आले की नवीन साहित्य जन्माला येते. 'फेसाटी' कादंबरीस साहित्य अकादमीसारखा मोठा पुरस्कार प्राप्त झाला, ही जतच्या वैभवात भर घालणारी गोष्ट आहे.

मच्छिंद्र ऐनापुरे म्हणाले की, शाळेमध्ये शिकवत असताना लहान मुलांसमोर आदर्श उभे करण्यासाठी मी लिहित गेलो. प्रतिकूल परिस्थितीमध्ये ज्यांनी ज्यांनी यशाचे शिखर गाठले, त्यांच्यावर लिहित गेलो आणि त्यातीलच एक कथा आठवीच्या बाल भारती या पुस्तकात समाविष्ट झाली. त्यामुळे लिखाणाची प्रेरणा वाढली.

प्राचार्य डॉ. ढेकळे यांच्याहस्ते साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त नवनाथ गोरे व बालभारती या आठवी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंद्र ऐनापुरे यांचा सत्कार केला.

यावेळी डॉ. श्रीकांत कोकरे यांनी गोरे व ऐनापुरे यांची प्रकट मुलाखत घेऊन त्यांच्या जीवनाचा धगधगता प्रवास प्रेक्षकांसमोर उभा केला. मराठी विभागप्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कुमार इंगळे यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. सागर सन्नके यांनी आभार मानले.

5.7.18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

• बुधवार ता. ४ जुलै २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात फेसाटीकार नवनाथ गोरे, मच्छिंद्र ऐनापुरे यांचा सत्कार

जत, (प्रतिनिधी): विद्यापीठात शिकत असताना अनेक पुस्तके वाचत गेलो. त्या पुस्तकात मांडलेले जग हे आपलेच आहे. आपणही जे जगलो. जे भोगले ते मांडले पाहिजे. आपलं दुष्काळी भागातील जगण साहित्यात आले पाहिजे या भूमिकेतूनच लिहीत गेलो आणि त्यातूनच 'फेसाटी' चा जन्म झाला असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे मराठी विभागाच्या वतीने साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त श्री. नवनाथ गोरे व बालभारती या इ. ८ वी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंन्द्र ऐनापुरे या दोघांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.व्ही.एस. ढेकळे हे होते. याप्रसंगी जिल्हा बँकचे संचालक विक्रमसिंह सावंत, जि.प. सदस्य सरदार पाटील, मराठी कन्नड साहित्य परिषदेचे डॉ.रवींद्र आरळी, डॉ. श्रीपाद जोशी, मराठी विभाग प्रमुख प्रा.सौ. एन.व्ही.मोरे. उपस्थित होते.डॉ.ढेकळे म्हणाले पुढे कि, जीवनमध्ये अनेक संकटे येतात,त्या संकटाशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य पुस्तकामध्ये असते म्हणून पुस्तके वाचली पाहिजेत. साहित्य हे माणसाचे जीवन समृद्ध करीत असते. विचारांची एकरूपता आणि सामाजिक संवेदनशीलता एकत्र आले कीं नविन साहित्य जन्माला येते. जत सारख्या दुष्काळी व ग्रामीण भागाला साहित्य अकादमी सारखा मोठा पुरस्कार प्राप्त झाला हे जत च्या वैभवात भर घालणारे आहे, ढेकळे म्हणाले

दुसरे सत्कारमूर्ती मच्छिंन्द्र ऐनापुरे म्हणाले कि, शाळेमध्ये शिकवीत असताना लहान मुलांच्या समोर आदर्श उभे करण्यासाठी मी लिहीत गेलो. प्रतिकूल परिस्थिमध्ये ज्यांनी ज्यांनी यशाचे शिखर गाठले त्यांच्यावर लिहीत गेलो आणि त्यातीलच एक कथा आठवीच्या बालभारती या पुस्तकात समाविष्ट झाली. त्यामुळे लिखाणाची प्रेरणा वाढली. प्रारंभी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त नवनाथ गोरे व बालभारती या इ.८ वी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंन्द्र ऐनापुरे या दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. श्रीकांत कोकरे यांनी नवनाथ गोरे व मच्छिंन्द्र ऐनापुरे यांची प्रकट मुलाखत घेऊन त्यांच्या जीवनाचा धगधगता प्रवास प्रेक्षांकासमोर उभा केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. एन.व्ही.मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे तर शेवटी आभार प्रदर्शन प्रा. सागर सन्नके यांनी केले.



जत:फेसाटीकार नवनाथ गोरे,मच्छिंन्द्र ऐनापुरे यांचा राजे रामराव महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

5.7.'18

Scanned by CamScanner

**संकेत टाइम्स**

• शनिवार ता. ७ जुलै २०१८

# भविष्यामध्ये निरोगी आणि आनंददायी जगण्यासाठी वृक्ष लागवड गरज

## प्राचार्य.डॉ.मिलिंद हुजरे

जत, (प्रतिनिधी): हवेचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे. हे वाढते प्रमाण सजीव सृष्टीसाठी घातक आहे. निसर्ग चक्राचा समतोल राखायचा असेल तर पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. भविष्यामध्ये निरोगी आणि आनंददायी जगायचे असेल तर वृक्ष लागवडीशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे वृक्ष लागवड करण्यात आली. डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले कि, वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची हानी होत आहे. मानवाच्या अति लोभामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्याचा विपरीत परिणाम जीवसृष्टीवर होत आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे अनेक जैव-विविधता धोक्यात आली आहे. बेसुमार वृक्षतोडीमुळे दुष्काळासारख्या संकटास नेहमी तोंड द्यावे लागत आहे. पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. या सर्वातून मार्ग काढायचा असेल तर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाशिवाय पर्याय नाही असेहि ते शेवटी म्हणाले.

यावेळी राजे रामराव महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षलागवड करण्यात आली.



गेल्यावर्षी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली होती आणि ती सर्वच्या सर्व ५०० वृक्ष जगवले असून या वर्षी ५०० वृक्षांची लागवड करण्यात येणार असून ती सर्व वृक्ष जगवण्याची हमी प्राचार्यांनी दिली.

8.7.18

Scanned by CamScanner

पुढारी | सांगली, शनिवार ७ जुलै २०१८

# दुष्काळी भागातील जगणेच फेसाटीत

## नवनाथ गोरे यांची माहिती; जतच्या राजे रामराव महाविद्यालयात कार्यक्रम

**येळवी : वार्ताहर**

विद्यापीठात शिकत असताना अनेक पुस्तके वाचत गेलो. त्या पुस्तकात मांडलेले जग हे आपलेच आहे. आपणही जे जगलो. जे भोगले ते मांडले पाहिजे. दुष्काळी भागातील जगणे साहित्यात आले पाहिजे, या भूमिकेतूनच लिहित गेलो. त्यातूनच फेसाटी कादंबरीचा जन्म झाला, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. नवनाथ गोरे यांनी केले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे अध्यक्षस्थानी होते.

जत येथील राजे रामराव महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने प्रा. गोरे आणि प्रा. मच्छिंद्र ऐनापुरे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

प्रा. गोरे म्हणाले, जीवनामध्ये अनेक संकटे येतात. त्यांच्याशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य पुस्तकांमध्ये असते. डॉ. श्रीकांत कोकरे यांनी प्रा. गोरे व प्रा. ऐनापुरे यांची प्रकट मुलाखत घेतली. मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. एन.व्ही.मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कुमार इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सागर सन्नके यांनी आभार मानले.



**जत : साहित्यिक प्रा. नवनाथ गोरे यांचा सत्कार करताना प्रभारी प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे, डॉ.रविंद्र आरळी, व प्रा.कुमार इंगळे.**

8-7-18

Scanned by CamScanner

मंगळवार, १० जुलै २०१८

# निरोगी जगण्यासाठी रोपलागवड आवश्यक

## डॉ.मिलिंद हुजरे : राजे रामराव महाविद्यालात रोपलागवड



जत : राजे रामराव महाविद्यालय परिसरात रोपलागवड करताना प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. व्ही. एस. ढेकळे व अन्य.

प्रतिनिधी

जत

हवेचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे. हे वाढते प्रमाण सजीव सृष्टीसाठी घातक आहे. निसर्ग चक्राचा समतोल राखायचा असेल तर पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. भविष्यामध्ये निरोगी आनंददायी जगायचे असेल तर वृक्ष लागवडीशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची हानी होत आहे. मानवाच्या अति लोभामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्याचा विपरीत परिणाम जीवसृष्टीवर होत आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे अनेक जैव-विविधता धोक्यात आली आहे. बेसुमार वृक्षतोडीमुळे दुष्काळासारख्या संकटास नेहमी तोंड द्यावे लागत आहे.

यावेळी राजे रामराव महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याहस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. गेल्यावर्षी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये पाचशे वृक्षांची लागवड करण्यात आली होती. आणि ती सर्वच्यासर्व पाचशे वृक्ष जगविले असून या वर्षी पाचशे वृक्षांची लागवड करण्यात येणार असून ती सर्व वृक्ष जगविण्याची हमी प्राचार्यांनी यावेळी दिली. प्रारंभी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे व डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी डॉ. राजेंद्र लवटे, प्रा. सी. वाय. मानेपाटील, प्रा. सिद्राम चव्हाण, डॉ. श्रीकांत कोकरे, प्रा. ए. टी. शिंदे, प्रा. डॉ. ए. के. भोसले, प्रा. प्रकाश सज्जन, प्रा. के. के. रानगर, प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी रोपलागवड केली.

11.7.18

Scanned by CamScanner

तरुण भारत
मंगळवार, १० जुलै २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात नवनाथ गोरे यांचा सत्कार

प्रतिनिधी
जत

विद्यापीठात शिकत असताना अनेक पुस्तके वाचत गेलो. त्या पुस्तकात मांडलेले जग हे आपलेच आहे. आपणही जे जगलो जे भोगले ते मांडले पाहिजे. आपलं दुष्काळी भागीतील जगणं साहित्यात आले पाहिजे या भूमिकेतूनच लिहीत गेलो आणि त्यातूनच फेसाटी चा जन्म झाला असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्याल, जत येथे मराठी विभागाच्या वतीने साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त नवनाथ गोरे व बालभारती या इ. आठवी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंद्र ऐनापुरे या दोघांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.



जत : राजे रामराव महाविद्यालय, जत येथे नवनाथ गोरे व मच्छिंद्र ऐनापुरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, डॉ. रविंद्र आरळी व अन्य.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे हे होते. याप्रसंगी जिल्ह बँकेचे उपाध्यक्ष विक्रमदादा सावंत, जि. प. शदस्य सरदार पाटील, मराठी कन्नड साहित्य परिषदेचे डॉ. रविंद्र आरळी, डॉ. श्रीपाद जोशी, मराठी विभाग प्रमुख प्रा. शौ. एन. व्ही. मोरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, जीवनामध्ये अनेक संकटे येतात त्या संकटाशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य पुस्तकामध्ये असते म्हणून पुस्तके वाचली पाहिजेत. साहित्य हे माणसाचे जीवन समृध्द करीत असते. विचारांची एकरूपता आणि सामाजिक संवेदनशीलता एकत्र आले की नवीन साहित्य जन्माला येते. जत सारख्या दुष्काळी व ग्रामीण भागाला साहित्य अकादमी सारखा मोठा पुरस्कार प्राप्त झाला हे जतच्या वैभवात भर घालणारी आहे असेही ते म्हणाले.

सत्कारमुर्ती मच्छिंद्र ऐनापुरे बोलताना म्हणाले की, शाळेमध्ये शिकवीत असताना लहान मुलांच्या समोर आदर्श उभे करण्यासाठी मी लिहीत गेलो. प्रतिकूल परिस्थिमध्ये ज्यांनी ज्यांनी यशाचे शिखर गाठले त्यांच्यावर लिहीत गेलो आणि त्यातीलच एक कथा आठवीच्या बालभारती या पुस्तकात समाविष्ट झाली. यामुळे लिखाणाची प्रेरणा वाढली. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त नवनाथ गोरे व बालभारती या इयत्ता आठवी मराठीच्या पुस्तकात लेख समाविष्ट झाल्याबद्दल मच्छिंद्र ऐनापुरे या दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. श्रीकांत कोकरे यांनी नवनाथ गोरे व मच्छिंद्र ऐनापुरे यांची प्रकट मुलाखत घेऊन त्यांच्या जीवनाचा धगधगता प्रवास प्रेक्षांकासमोर उभा केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे तर आभार प्रदर्शन प्रा. सागर सन्नके यांनी मानले.

11.7.18

Scanned by CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१५ जुलै २०१८

# लोकसंख्या नियंत्रणात ठेवल्यास शाश्वत विकासापर्यंत जावू शकतो

**- डॉ. व्ही. एस. ढेकळे**

**जत : प्रतिनिधी**

आपल्याकडे उपलब्ध असणारी साधन संपत्ती आणि त्या साधनांचा उपभोग घेण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात ठेवली तरच आपण शाश्वत विकासाकडे जाऊ शकतो असे प्रतिपादंन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

राजे रामराव महाविद्यालय, जत येथे अर्थशास्त्र विभागाच्यावतीने 'लोकसंख्या' दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मिलींद हुजरे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. श्रीकांत कोकरे उपस्थित होते.

डॉ. ढेकळे म्हणाले, लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नावर उपाय शोधून वाढत्यालोकसंखेच्या हाताला काम दिले तरच समाज निकोप राहील. यावेळी प्रमुख वक्ते डॉ. श्रीकांत कोकरे यांनी उत्क्रांतीवादापासून लोकसंख्या वाढीची कारणे, परिणाम व उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करून ते म्हणाले कि, लोकसंख्या नियंत्रणात ठेवली नाही तर लोकसंख्या 'दिन' साजरा करण्यापेक्षा आपणावर लोकसंख्या दीन (गरीब) साजरा करावा लागेल. त्यामुळे शासन स्तराबरोबरच वैयक्तिकपातळीवर लोकसंख्या नियंत्रणासाठी ठोस पाऊले उचलली पाहिजेत.

प्रारंभी शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सोमनाथ काळे यांनी आपल्या प्रास्ताविकात लोकसंख्या दिन साजरा करण्यामागील उद्देश सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश पडोळकर यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा. अशोक बोगुलवार यांनी केले.

याप्रसंगी प्रा. सी. वाय. मानेपाटील, प्रा. डॉ. भीमाशंकर डहाळके, प्रा. एस. डी. टोंगारे, प्रा. पुंडलिक चौधरी, प्रा. आर. एस. बनसोडे, प्रा. आर. जे. गोरे उपस्थित होते.

16.7.18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
रविवार ता. २९ जुलै २०१८

# राष्ट्रीय सेवा योजना हे राष्ट्रसेवेची मूल्ये रूजवण्याचे महत्वपूर्ण माध्यम :डॉ. श्रीकांत कोकरे

जत (प्रतिनिधी): राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्ये, राष्ट्रसेवा व राष्ट्रभक्ती यांचे बीज रूजवण्याचे प्रमुख माध्यम आहे. यामधूनच नवीन श्रमसंस्कारक्षम पीढी निर्माण होऊ शकते असे प्रतिपादन डॉ.श्रीकांत कोकरे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमीत कार्यक्रमांच्या उदघाटनप्रसंगी बोलत होते.

ते पुढे म्हणाले फक्त सीमेवर जाऊन लढणे म्हणजेच राष्ट्रभक्ती किंवा राष्ट्रसेवा नसून ती छोट्या -छोट्या कृतीतून ही करता येते. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपावी व आपल्या कृतीतून दाखवावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे मार्गदर्शन करताना म्हणाले,स्वयंसेवकांनी स्वस्थ भारत निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करावी. त्यांनी तुकाराम महाराजांच्या 'क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे' या उक्तीचा उल्लेख करून प्रत्यक्ष कृतीचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

डॉ. राजेंद्र लवटे यांनी प्रास्ताविक व स्वागत करताना राष्ट्रीय सेवा योजनेची मार्गदर्शक तत्वे सांगून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीशकुमार पडोळकर यांनी केले तर आभार डॉ. भिमाशंकर डहाळके यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा. कृष्णा रानगर, डॉ. विजय जाधव, प्रा. हिरामण टोंगारे, स्वयंसेवक, स्वयंसेविका मोठया संख्येने उपस्थित होते.

30.7.18

Scanned by CamScanner

तरुण भारत
मंगळवार, ३१ जुलै २०१८




जत : राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमात बोलताना डॉ. कोकरे

# राष्ट्रीय सेवा योजना हे राष्ट्रसेवेची मूल्ये रूजवण्याचे माध्यम : डॉ. कोकरे

जत : राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्ये, राष्ट्रसेवा व राष्ट्रभक्ती यांचे बीज रूजवण्याचे प्रमुख माध्यम आहे. यामधूनच नवीन श्रमसंस्कारक्षम पिढी निर्माण होऊ शकते असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत कोकरे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालयं, जत येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमीत कार्यक्रमांच्या उदघाटनप्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले फक्त सीमेवर जाऊन लढणे म्हणजेच राष्ट्रभक्ती किंवा राष्ट्रसेवा नसून ती छोट्या-छोट्या कृतीतून ही करता येते. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपावी व आपल्या कृतीतून दाखवावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे मार्गदर्शन करताना म्हणाले स्वयंसेवकांनी स्वस्थ भारत निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करावी. त्यांनी तुकाराम महाराजांच्या क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे या उक्तीचा उल्लेख करून प्रत्यक्ष कृतीचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. डॉ. राजेंद्र लवटे यांनी स्वागत करताना राष्ट्रीय सेवा योजनेची मार्गदर्शक तत्वे सांगून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीशकुमार पडोळकर यांनी केले तर आभार डॉ. भिमाशंकर डहाळके यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा. कृष्णा रानगर, डॉ. विजय जाधव, प्रा. हिरामण टोंगारे, स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते.

1.8.18

Scanned by CamScanner

लोकमत सांगली, शुक्रवार, दि. २४ ऑगस्ट २०१८

# जत येथे वाजपेयी यांना श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

24-8-2018

बिळूर : अटलबिहारी वाजपेयी यांच्या व्यक्तित्त्वाचे अनेक पैलू होते. ते उत्कृष्ट राजकारणी, सहृदय कवी, राजकीय तत्त्वज्ञ होते. त्यांच्या जाण्याने संघर्षशील, उदारमतवादी व आदर्शवादी युगाचा अस्त झाला आहे, असे प्रतिपादन प्राचार्य प्रमोद पोतनीस यांनी केले.

जत येथील राजे रामराव महाविद्यालयात हिंदी विभागाच्यावतीने माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. एस. ढेकळे होते.

डॉ. ढेकळे म्हणाले की, संघर्ष हेच जीवन आहे, कोणत्याही उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी प्रामाणिक कष्ट करण्याची चिकाटी आपल्याठायी असणे आवश्यक आहे, हेच आपल्याला वाजपेंयी यांच्या जीवनपटाकडे पाहिल्यास दिसून येते. त्यांच्यासारखा आदर्शवादी राजकारणी शोधूनही सापडणार नाही. वाजपेयींनी देशाची प्रतिमा जागतिक पटलावर नेहमीच उंचावण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. श्रीकांत कोकरे यांनी प्रास्ताविक, तर प्रा. सतीश पडोळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एच. डी. टोंगारे यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

25-9-18

Scanned by CamScanner

लोकमत सांगली, सोमवार, दि. १० सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयास पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

जत : येथील राजे रामराव महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २०१८ -१९ या वर्षासाठी 'उत्कृष्ट महाविद्यालय' व डॉ. राजेंद्र लवटे यांना द्वितीय क्रमांकाच्या 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजे रामराव महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मागील तीन वर्षात राबविलेले नियमीत व शिबिरातील उपक्रम, तसेच महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेला पाझर तलाव व एक हजारपेक्षा जादा केलेली वृक्ष लागवड, ठिंबक सिंचन करून केलेले वृक्षसंवर्धन याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला आहे.

5-10-2018

Scanned by CamScanner

पुढारी
सांगली, शनिवार
८ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठाचा पुरस्कार

**येळवी : वार्ताहर,** जत येथील राजे रामराव महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाला आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा विभागाचे डॉ. राजेंद्र लवटे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ही माहिती प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी दिली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने गेल्या तीन वर्षात नियमितपणे राबविलेले विविध उपक्रम, महाविद्यालय परिसरांत तयार केलेला पाझर तलाव, एक हजारांपेक्षा अधिक लावलेली झाडे आणि त्यांच्या संवर्धनासाठी केलेले ठिबक सिंचन यांची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला आहे.

8.9.18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

07/09/2018

# क्रांतीची बीजे पेरणारा कवी दुष्यंतकुमार

## प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे

जत (प्रतिनिधी): व्यवस्थेच्या असंगतीवर बोट ठेवून सत्तेच्या दमनशाही विरोधात आवाज उठवणारा कवी दुष्यंतकुमार यांची कविता जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनात क्रांतीची बीजे पेरणारी होती.ते व्यवस्थेला मुळापासून बदलण्यासाठी संघर्षरत होते.म्हणून ते आजच्या संदर्भात ही तितकेच प्रासंगिक आहेत. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी केले.ते राजे रामराव महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने दुष्यंतकुमार जन्मदिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात नवोदित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख प्रा.एच. डी.टोगारे हे होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी दुष्यंतकुमार यांचा जीवनपट विध्यार्थ्यासमोर मांडला व म्हणाले,जीवनसत्य हेच काव्यगतसत्य असते. दुष्यंतकुमार यांनी तत्कालीन व्यवस्थेच्या विसंगती वर सटीक भाष्य केले आहे.व्यवस्थेमधील विसंगती जोपर्यंत संपणार नाहीत तोपर्यंत दुष्यंतकुमार प्रासंगिक राहतील. तत्पूर्वी दुष्यंतकुमार यांच्या कविता व जीवनसंदर्भातील भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते झाले.त्यानंतर दुष्यंतकुमार यांच्या जीवनावर आधारित लघुपट विध्यार्थ्यांना दाखवण्यात आला . या कार्यक्रमासाठी प्रा.योगिता देशमुख, प्रा.डॉ.दिनकर कुटे,प्रा.अशोक बोगुलवार, प्रा.डॉ.सोमनाथ काळे हे उपस्थितीत होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.सतीशकुमार पडोळकर यांनी केले.

8-9-18

Scanned by CamScanner

तरुण भारत

शुक्रवार ७ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे

जत : राजे रामराव महाविद्यालयात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांची ९१ वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे म्हणाले की, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या ज्ञानदानाच्या पवित्र कार्यात त्यांच्या सुविद्य पत्नी सुशीलादेवी साळुंखे यांनी मोलाची साथ दिली म्हणून विवेकानंद परिवार त्यांना संस्थामाता मानतात. असे सांगून ते म्हणाले स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांनी बापुजींच्या कार्याला हातभार लावताना त्यांनी आपल्या मुलांवरही चांगले संस्कार केले. संस्थेतील शिपायापासून ते प्राचार्यपर्यंत कोणीही संस्थामातांना भेटायला आले की बापूजींचा प्रसाद समजून जेवण खा असे सांगून सर्वांना प्रेमाने खाऊ घालायच्या कधीही कोणालाही त्यांनी रिकाम्या हाताने पाठविले नाही. बापुजींनी ही संस्था शून्यातून मोठ्या त्यागातून आणि कष्टातून उभी केली आहे. त्या त्याग आणि कष्टामध्ये संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचा सिंहाचा वाटा आहे. असे यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्राध्यापक आर.बी.पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. डॉ. सोमनाथ काळे यांनी तर आभार प्रा. डॉ. भीमाशंकर डहाळके यांनी केले.

8-9-18

Scanned by CamScanner

तरुण भारत

बुधवार, ५ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयाचे केंद्रीय नॅक समितीकडून मूल्यांकन

प्रतिनिधी
जत

राजे रामराव महाविद्यालय, जतला केंद्रीय नॅक समितीने भेट देऊन महाविद्यालयाचे तिसरे नॅक मूल्यांकन नवीन निकषानुसार करण्यात आले. नॅक कार्यालय बेंगलोर यांच्याकडून त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये गुजरात, बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. परिमल व्यास यांची चेअरमन म्हणून तर आसाम गोहाटी येथील पंडू कॉलेज पंडूचे प्राचार्य डॉ. जोगेश काकती व आंध्र प्रदेश तिरूपती येथील महिला विद्यापीठाच्या प्राध्यापिका सौ. के. उषाराणी यांची समिती गठीत केली होती.

केंद्रीय नॅक कार्यालय बेंगलोर यांनी ठरवून दिलेल्या सात नियमानुसार महाविद्यालयातील प्रत्येक विभागाची तपासणी करण्यात आली. यामध्ये संशोधन कार्य, महाविद्यालयातील सोयीसुविधा, कार्यरत असलेला स्टाफ, प्रत्येक विषयांचे विभाग, एन. सी. सी. विभाग, सांस्कृतिक विभाग, एन. एस. एस. विभाग, जिमखाना विभाग, वुमेन इम्पावरमेंट, प्लेसमेंट सेल, कार्यालयीन ऑफिस, ग्रंथालय, सायन्स विभागाच्या प्रयोगशाळा अशा सर्व घटकांची नवीन निकषानुसार सखोल तपासणी करण्यात आली.

दोन दिवस महाविद्यालयाची तपासणी केल्यानंतर अंतिम बैठकीच्या वेळी नॅक मूल्यांकन समितीचे चेअरमन कुलगरू डॉ. परिमल व्यास यांनी सावधान व्यक्त करून म्हणाले की, उच्च शिक्षण प्रक्रिया अधिकाधिक विकास कसा पावेल याकडे आपण सर्वांनी लक्ष देऊन विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण कशी होतील याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. भाग ग्रामीण असो वा शहरी मूल्यांकन करीत असताना सर्वांना नियम सारखाच असतो.

आम्ही ग्रामीण भागात आहोत म्हणून पाठीमागे राहून चालणार नाही. शिक्षण क्षेत्रात संवेदिनशीलता अतिशय महत्वाची असून आपण प्रामणिकपणे विद्यार्थ्यांचे हित जपले पाहिजे, असेही ते शेवटी म्हणाले.

## राजे रामराव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागास व्दितीय पुरस्कार

**जत :** राजे रामराव महाविद्यालय जतला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने यावर्षीचा उत्कृष्ट महाविद्यालय व डॉ. राजेंद्र लवटे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून सांगली जिल्हा स्तरीय व्दितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी दिली. राजे रामराव महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मागील तीन वर्षात राबविलेले विविध नियमीत व शिबिरातील उपक्रम तसेच महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेला पाझर तलाव व एक हजार पेक्षा केलेली वृक्ष लागवड व ठिबक सिंचन करून केलेले वृक्षसंवर्धन याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला आहे. सदर पुरस्कार मिळवण्यात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, स्वयंसेवक यांनी कष्ट घेतले असून यावर्षीदिखील विविध उपक्रम राबवून प्रथम पुरस्कार मिळविण्याचा मानस डॉ. राजेंद्र लवटे यांनी व्यक्त केला.

6.9.18

Scanned by CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

५ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास पुरस्कार



**जत : प्रतिनिधी**

राजे रामराव महाविद्यालय, जतला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने यावर्षीचा उत्कृष्ट महाविद्यालय व डॉ. राजेंद्र लवटे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून सांगली जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी दिली.

राजे रामराव महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मागील तीन वर्षांत राबविलेले विविध नियमित व शिबिरातील उपक्रम; तसेच महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेला पाझर तलाव व १००० पेक्षा केलेली वृक्ष लागवड व ठिबक सिंचन करून केलेले वृक्षसंवर्धन याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळवण्यात सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, स्वयंसेवक यांनी कष्ट घेतले असून, यावर्षीदेखील विविध उपक्रम राबवून प्रथम पुरस्कार मिळवण्याचा मानस डॉ. राजेंद्र लवटे यांनी व्यक्त केला.

Scanned by CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
३ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयाचे 'नॅक'कडून मूल्यांकन

जत : प्रतिनिधी

येथील राजे रामराव महाविद्यालयाला केंद्रीय नॅक समितीने भेट देऊन महाविद्यालयाचे तिसरे नॅक मूल्यांकन नवीन निकषानुसार करण्यात आले. डॉ. परिमल व्यास - चेअरमन, डॉ. जोगेश काकती, वक्त्या उषाराणी यांच्या समितीने तपासणी केली.

संशोधन कार्य, महाविद्यालयातील सोयी-सुविधा, कार्यरत असलेला स्टाफ, प्रत्येक विषयांचे विभाग, एन.सी.सी. विभाग, सांस्कृतिक विभाग, एन.एस.एस. विभाग, जिमखाना विभाग, ग्रंथालय, सायन्स विभागाच्या प्रयोगशाळा अशा सर्व घटकांची नवीन निकषानुसार सखोल तपासणी केली. प्रारंभी एन. सी. सी.च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिल्यानंतर प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे व डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी स्वागत केले. नॅक मूल्यांकन समितीचे चेअरमन डॉ. परिमल व्यास यांनी समाधान व्यक्त केले.

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

सोमवार ता. ३ सप्टेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास शिवाजी विद्यापीठाचा द्वितीय पुरस्कार




जत,प्रतिनिधी : राजे रामराव महाविद्यालय जतला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने यावर्षीचा उत्कृष्ट महाविद्यालय व डॉ. राजेंद्र लवटे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून सांगली जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी दिली.

राजे रामराव महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मागील तीन वर्षात राबविलेले विविध नियमीत व शिबिरातील उपक्रम तसेच महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेला पाझर तलाव व १ हाजार पेक्षा केलेली वृक्ष लागवड व ठिबक सिंचन करून केलेले वृक्षसंवर्धन याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला आहे. सदर पुरस्कार मिळवण्यात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, स्वयंसेवक यांनी कष्ट घेतले असून यावर्षीदेखील विविध उपक्रम राबवून प्रथम पुरस्कार मिळवण्याचा मानस डॉ. राजेंद्र लवटे यांनी व्यक्त केला.

4-9-18

Scanned by CamScanner

शंकेत टाइम्स
शनिवार 1 सप्टेंबर 2018

# राजे रामराव महाविद्यालयाला केंद्रीय नॅक समितीकडून मुल्यांकन




जत,(प्रतिनिधी)राजे रामराव महाविद्यालय, जतला केंद्रीय नॅक समितीने भेट देऊन महाविद्यालयाचे तिसरे नॅक मुल्यांकन नवीन निकषानुसार करण्यात आले. नॅक कार्यालय बेंगलोर यांच्याकडून त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये गुजरात बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.परिमल व्यास यांची चेअरमन म्हणून तर आसाम गोव्हाटी येथील पंडू कॉलेज पंडूचे प्राचार्य डॉ.जोगेश काकती व आंध्र प्रदेश तिरुपती येथील महिला विद्यापीठाच्या प्राध्यापिका सौ.के.उषाराणी यांची समिती गठीत करण्यात आली होती.

केंद्रीय नॅक कार्यालय बेंगलोर यांनी ठरवून दिलेल्या सात नियमानुसार महाविद्यालयातील प्रत्येक विभागाची तपासणी करण्यात आली. यामध्ये संशोधन कार्य, महाविद्यालयातील सोयीसुविधा, कार्यरत असलेला स्टाफ, प्रत्येक विषयांचे हविभाग, एन.सी.सी. विभाग, सांस्कृतिक विभाग, एन.एस.एस. विभाग, जिमखाना विभाग, वुमेन इम्पावरमेंट, प्लेसमेंट सेल, कार्यालयीन ऑफीस, ग्रंथालय, सायन्स विभागाच्या प्रयोगशाळा अशा सर्व घटकांची नवीन निकषानुसार सखोल तपासणी करण्यात आली. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी कोणकोणते उपक्रम राबविण्यात आले याचीही सखोल तपासणी करण्यात आली.प्रारंभी एन.सी.सीच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिल्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे व डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी नॅक मुल्यांकन टीमचे स्वागत केले.

दोन दिवस महाविद्यालयाची तपासणी केल्यानंतर अंतिम बैठकीच्या वेळी नॅक मुल्यांकन समितीचे चेअरमन कुलगुरू डॉ.परिमल व्यास यांनी समाधान व्यक्त करून म्हणाले कि, उच्च शिक्षण प्रक्रिया अधिकाधिक विकास कशी पावेल याकडे आपण सर्वांनी लक्ष देऊन विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण कशी होतील याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.भाग ग्रामीण असो वा शहरी असो मुल्यांकन करीत



राजे रामराव महाविद्यालयाला केंद्रीय नॅक समितीकडून मुल्यांकन समितीकडून समिती कडून पत्र देण्यात आले.

असताना सर्वांना नियम सारखाच असतो. आम्ही ग्रामीण भागात आहोत म्हणून पाठीमागे राहून चालणार नाही.शिक्षण क्षेत्रात संवेदिनशीलता अतिशय महत्वाची असून आपण प्रामाणिकपणे विध्यार्थ्यांचे हित जपले पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले. शेवटी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध गुण दर्शन कार्यक्रम सादर करण्यात आला. शेवटी महाविद्यालयीन न्याक समितीचे समन्वयक प्रा.डॉ.श्रीकांत कोकरे यांनी सर्वांचे आभार मानले.

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
शनिवार ता. २७ ऑक्टोंबर २०१८

# कोजागिरी पौर्णिमेनिमित्त प्राध्यापकांसाठी काव्यसंमेलन संपन्न

जत, (प्रतिनिधी):आज शिक्षण क्षेत्रात देखिल कमालीचा ताण-तणाव वाढला आहे. शिक्षण क्षेत्रातील समस्यांमुळे ताण-तणावामध्ये भर पडत आहे. ताण-तणावातून मुक्त होण्यासाठी कवितेसारखा दुसरा पर्याय नाही. कविता ही जीवनामध्ये आनंद निर्माण करते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.ते राजे रामराव महाविद्यालय, जत मराठी विभागाच्या वतीने कोजागिरी पोर्णिमेनिमित्त प्राध्यापकांसाठी काव्यसमेलन आयोजित करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी काव्यसंमेलन आयोजित करण्यामागील भूमिका विशद केली.कविता वाचनाने मन आल्हाददायी बनते. कवितेमुळे निर्मळ आनंदाची निर्मिती होती. मानवी मनातील दु:ख घालवून हास्य निर्माण करण्याची शक्ती कवितेमध्ये आहे असे सांगून प्राचार्य व्ही. एस. ढेकळे यांनी कोजागिरी पोर्णिमेनिमित्त प्राध्यापकांसाठी काव्यसंमेलन आयोजित केल्याबद्दल मराठी विभागास धन्यवाद दिले. याप्रसगी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विनोदी व हास्यनिर्माण करणा-या कविता सदर करून कोजागिरी पोर्णिमेच्या चांदण्यात वेगळाच रंग भरला.. तर काही प्राध्यापकांनी व्होट्सअप वरील विनोदी किस्से सांगून काव्यसंमेलनात वेगळीच रंगत आणली तर काहींनी सुरेल आवाजात आपल्या कविता सदर करून रात्र जागविली. शेवटी गरम गरम दुध त्यात काजू, बदाम, पिस्ता, चारोळीचा स्वाद व साखरेचा गोडवा असलेले दुध पिऊन काव्य संमेलनाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. कुमार इंगळे यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा. डा. दिनकर कुटे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. सुरेखा व्हसमाने, प्रा. प्रकाश सज्जन, रामकृष्ण हेगडे यांनी परिश्रम घेतले. या काव्य संमेलनास प्रा. सी. वाय. मानेपाटील, प्रा. आर. डी. करांडे, प्रा. सिद्राम चव्हाण, प्रा. डॉ. राजेंद्र लवटे, प्रा. श्रीमंत ठोंबरे, प्रा. एच. डी. टोंगारे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

28/10/2018

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

24/10/2018

# राजे रामराव महाविद्यालयात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचा स्मृतिदिन संपन्न

जत,(प्रतिनिधी);संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचा स्मृतिदिन संपन्न झाला संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे जेष्ट प्राध्यापक एस. डी. चव्हाण यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या खांद्याला खांदा लावून बापूजींच्या शिक्षण कार्यात मोलाचे योगदान दिले. म्हणून विवेकानंद परिवार त्यांना संस्थामाता असे संबोधतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी केले. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. आर. बी. पाटील, प्रा. सी. वाय. मानेपाटील, प्रा. सिद्राम चव्हाण, डॉ. श्रीकांत कोकरे, प्रा. आर. डी. करांडे प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.

26/10/2018

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
गुरूवार ता. १८ ऑक्टोंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन संपन्न



जत,(प्रतिनिधी): कोणत्याही क्षेत्रात आपणास यशस्वी व्हायचे असेल तर त्या त्या क्षेत्रातील नव नवे ज्ञान, नव-नवी माहिती ज्ञात करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी वाचन केल्याशिवाय पर्याय नाही. एक चांगले पुस्तक अनेक पिढ्यांसाठी अमूल्य संपत्ती आहे असे प्रतिपादन कोल्हापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जी.पी.माळी यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे मराठी विभागाच्या वतीने १५ ऑक्टोबर हा दिवस डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे हे होते.लेखन वाचन आणि चिंतन या माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या महत्वाच्या घटना आहेत असे सांगून डॉ. जी.पी. माळी पुढे म्हणाले कि, माणसं एका रात्रीत मोठी होत नाहीत तर ते परिश्रमाने मोठी होतात. युवकांनी न चुकता पुस्तके वाचली पाहिजेत कारण पुस्तके हि मस्तके फोडतात आणि पुस्तकांनी मस्तके फुटलेली माणसंच समाज घडवितात असेही ते शेवटी म्हणाले.

प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे म्हणाले,डॉ.कलाम यांचे जीवन आदर्शवत आहे. त्यांनी रामेश्वर पासून ते राष्ट्रपती भवनापर्यंतच्या प्रवासाचे सारे श्रेय पुस्तकांना दिले आहे.त्यांचे जीवन जे घडले ते पुस्तकामुळेच घडले असे सांगून ते पुढे म्हणाले कि, अब्दुल कलाम यांनी वाचन हा केवळ छंद म्हणून न जोपासता जीवनाच्या वाटचालीतील एक गरज म्हणून वाचन केले पाहिजे. पुस्तके केवळ आपल्याला प्रेरित करीत नसून त्याबरोबरच ते आपल्याला ज्ञान देतात.आयुष्यात पुढे पुढे यशाच्या मार्गापर्यंत जाण्यासाठी वाचन महत्वाचे आहे. कारण पुस्तके वाचनाने आपले चारित्र्य चांगले निर्माण होते आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी चांगले चारित्र्य महत्वाचे आहे असेही ते शेवटी म्हणाले.

प्रारंभी प्रास्ताविकात प्रा. कुमार इंगळे यांनी संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंतचा आढावा घेऊन वाचनाचे महत्व सांगितले.प्रमुख मान्यवरांचे स्वागत मराठी विभागप्रमुख प्रा. सौ.एन.व्ही. मोरे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. दिनकर कुटे यांनी तर शेवटी आभार प्रदर्शन प्रा.सुरेख व्हसमाने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

20.10.18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

शुक्रवार ता. ५ ऑक्टोंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात महिला 'उद्योजगता' भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन

जत, (प्रतनिधी): राजे रामाराव महाविद्यालय, जत येथे वाणिज्य विभागाच्या वतीने यशस्वी महिला उद्योजगता या विषयावर भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते संपन्न झाले. वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रात ज्या-ज्या महिलांनी आपला स्वतंत्र ठसा उमटविला अशा महिला उद्योजकांची माहिती संकलित करून भित्तीपत्रीकेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे म्हणाले कि, महिलांच्यामध्ये क्रयशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्यामध्ये प्रचंड उर्जा आहे. त्या उर्जेच्या जोरावरच रिचा कोर, एकता कपूर, चंदा कोचर, आदिती गुप्ता, इंदू जैन, किरण मुझामदार यासारख्या भारतीय महिलांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. या यशस्वी महिला उद्योजकांचा आदर्श आजच्या महिला विद्यार्थिनींनी आपल्या समोर ठेवला पाहिजे. मुलींनीही उद्योग क्षेत्रात उतरले पाहिजे असेही प्राचार्य शेवटी म्हणाले. प्रारंभी प्रा.अशोक हेरवाडे यांनी भित्तीपत्रिका आयोजन करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी प्रा. डॉ.सोमनाथ काळे, प्रा.आर जे गोरे व प्रा.अशोक बोगुलवार यांनी भित्ती पत्रीकेसाठी परिश्रम घेतले.

5-10-18

Scanned by CamScanner

तरुण भारत
गुरुवार, ४ ऑक्टोबर २०१८

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंत्ती श्रमदानाने साजरी

## राजे रामराव महाविद्यालयात अनोखा उपक्रम

प्रतिनिधी
जत

राजे रामराव महाविद्यालय, जत येथे महात्मा गांधी १५० वी व लालबहादूर शास्त्री यांची ११४ वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. ढेकळे म्हणाले की, अहिंसा व सत्य या तत्वाची देणगी महात्मा गांधी यांनी जगाला दिली. आज युवकांना महात्मा गांधीजींच्या विचारांची गरज आहे. अहिंसात्मक व असहकार आंदोलनाने महात्मा गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी संपुर्ण जगाला प्रेरित केले. असहकार आणि अहिंसेच्या तत्वाचा सर्वप्रथम सत्याग्रह महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये करून तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून दिले.

भारतात परत आल्यानंतर महात्मा गांधीजींनी चंपारण्य मधील शेतकऱ्यांना अन्याया विरूध्द प्रतिकार करण्यासाठी संघटित केले. गरिबी निर्मुलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवून दिले. महात्मा गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्वाचा पुरस्कार केला. आणि जगालाही सत्य आणि अहिंसेची देणगी दिली.

त्याचबरोबर लालबहादूर शास्त्री हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्वतंत्र सैनिक व स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान होते. लालबहादूर शास्त्री हे संयमी व्यक्तिमत्व व साधे जीवन जगणारे होते.

लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान हा नारा देऊन सैनिकांचे व शेतकऱ्यांचे महत्व पटवून दिले. आज राष्ट्राला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंत्ती राजे रामराव महाविद्यालयामध्ये एन. सी. सी. व विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विदयार्थ्यांचे व प्राध्यापकांचे गट पडून महाविद्यालयाच्या २३ एकर परिसराची स्वच्छता करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आर. बी. पाटील यांनी केले.

**महात्मा गांधी यांच्या विचारांची खऱ्या अर्थाने आज समाजाला गरज**

सुत्रसंचालन कुमार इंगळे यांनी केले तर आभार प्रा. सोमनाथ काळे यांनी मानले. यावेळी प्रा. पी. ए. सावंत प्रा. सी. वाय. माने पाटील, प्रा. आर. डी. कारंडे, प्रा. के. एम. धनगोंड व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

5/10/18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
बुधवार ता. ३ ऑक्टोंबर २०१८

# रामराव महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री जयंती निमित्त श्रमदान

जत,(प्रतिनिधी); राजे रामराव महाविद्यालय, जत येथे महात्मा गांधी यांची १५० वी व लाल बहाद्दूर शास्त्री यांची ११४ वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य निमित्त श्रमदान डॉ. व्ही.एस. ढेकळे म्हणाले कि, अहिंसा व सत्य या तत्वाची देणगी महात्मा गांधी यांनी जगाला दिली. आज युवकांना महात्मा गांधीजींच्या विचारांची गरज आहे. अहिंसात्मक व असहकार आंदोलनाने महात्मा गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. असहकार आणि अहिंसेच्या तत्वाचा सर्वप्रथम सत्याग्रह महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये करून तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून दिले असे सांगून प्राचार्य पुढे म्हणाले कि, भारतात परत आल्यानंतर महात्मा गांधीजींनी चंपारण्य मधील शेतकऱ्यांना अन्याय विरुद्ध प्रतिकार करण्यासाठी संघटित केले. गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे सामान हक्क, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि स्वातंत्र्यासाठी देशभरामध्ये चळवळ उभी केली. सत्याच्या व अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवून दिले. महात्मा गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्वाचा पुरस्कार केला आणि जगालाही सत्य आणि अहिंसेची देणगी दिली..

त्याचबरोबर लालबहाद्दूर शास्त्री हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्वतंत्र सैनिक व स्वंतत्र भारताचे दुसरे पंतप्रधान होते. लालबहाद्दूर शास्त्री हे एक संयमी व्यक्तिमत्व व साधे जीवन जगणारे होते. लालबहाद्दूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान हा नारा देऊन सैनिकांचे व शेतकऱ्यांचे महत्व पटवून दिले. आज राष्ट्राला महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या विचारांची गरज आहे असेही प्राचार्य शेवटी म्हणाले.

महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री जयंती निमित्त राजे रामराव महाविद्यालयामध्ये एन.सी.सी. व विद्यार्थी- विद्यार्थिनीच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे गट पडून महाविद्यालयाच्या २३ एकर परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आर.बी. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे यांनी तर शेवटी आभार प्रदर्शन प्रा डॉ. सोमनाथ काळे यांनी केले. यावेळी प्रा. पी ए. सावंत, प्रा. सी.वाय.माने पाटील , प्रा. आर डी .कारंडे, प्रा. के.एम. धनगोंड व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.



राजे रामराव महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त श्रमदान करून विद्यालयाचा परिसराची स्वच्छता करण्यात आली.

5-10-18

Scanned by CamScanner

## थोडक्यात

### शेतकऱ्यांना फसविण्याबाबत सर्वच पक्षांचे एकमत

नांदेड : शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव देतांना यंदा सरकारने दोनशे रुपयांची वाढ केली. परंतु ही दरवाढ नसून, शासनाने नियमाच्या चौकटीत राहून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील साखर सम्राटांना वाचविण्यासाठीच शेतकऱ्यांना फसवण्यासाठी सरकार आणि राजकीय लबाड पक्षाने एकमत केले असल्याचे आरोप खासदार राजू शेट्टी यांनी ऊस परिषदेत बोलताना केला.

# राजे रामराव महाविद्यालयात संविधान दिन संपन्न



संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात घटनेच्या सरनाम्याचे वाचन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे व मान्यवर.

जत, (प्रतिनिधी): संविधान हे भारतीय जनतेचे दीपस्तंभ असून भारतीय जनतेचा जगण्याचा आधार आहे. आपण २१ व्या शतकात वावरत असताना माणसांच्या मनातील जात आणि धर्म नष्ठ होत नाही. हे आपल्या भारतीयांचे दुर्दैव आहे. असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. व्ही.एस. ढेकळे यांनी केले. ते राजे रामरावमहाविद्यालयाच्या 'राज्यशास्त्र' विभागाच्या वतीने 'संविधान दिना' निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. मानेपाटील हे होते. याचवेळी डॉ. श्रीकांत कोकरे, प्रा. एस. डी. चव्हाण, प्रा. डॉ. भीमाशंकर डहाळके, प्रा.श्रीमंत ठोंबरे प्रमुख उपस्थित होते.

मानवता हा एकच धर्म आहे हे भारतीय संविधानाने आपणास दिलेली देणगी आहे असे सांगून प्राचार्य पुढे म्हणाले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान तयार करीत असताना प्रत्येक घटकांचा स्वतंत्रपणे विचार केला आहे. निव्वळ माणसाचा विचार न करता निसर्गातील प्रत्येक घटकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्रपणे घटनेत केला आहे. जगामधील सर्वात मोठी लोकशाही राज्यघटना भारतीय असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. मानेपाटील यांनी भारतीय राज्यघटनेचा आढावा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या 'सरनाम्याचे ' वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन राज्यशास्त्र विभागातील प्रशिक्षणार्थींनी केले.

२४/१२/१८

Scanned by CamScanner

* तरुण भारत *

27/11/2018

# राजे रामराव महाविद्यालयात संविधान दिन

प्रतिनिधी
जत

संविधान हे भारतीय जनतेचे दीपस्तंभ असून भारतीय जनतेचा जगण्याचा आधार आहे. आपण २१ व्या शतकात वावरत असताना माणसांच्या मनातील जात आणि धर्म नष्ठ होत नाही. हे आपल्या भारतीयांचे दुर्दैव आहे. असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. व्ही.एस. ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालयाच्या राज्यशासत्र' विभागाच्या वतीने संविधान दिना' निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. मानेपाटील हे होते. याचवेळी डॉ. श्रीकांत कोकरे, प्रा. एस. डी. चव्हाण, प्रा. डॉ. भीमाशंकर डहाळके, प्रा.श्रीमंत ठोंबरे प्रमुख उपस्थित होते.

मानवता हा एकच धर्म आहे हे भारतीय संविधानाने आपणास दिलेली देणगी आहे असे सांगून प्राचार्य पुढे म्हणाले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान तयार करीत असताना प्रत्येक घटकांचा स्वतंत्रपणे विचार केला आहे. निव्वळ माणसाचा विचार न करता निसर्गातील प्रत्येक घटकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्रपणे घटनेत केला आहे. जगामधील सर्वात मोठी लोकशाही राज्यघटना भारतीय असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. मानेपाटील यांनी भारतीय राज्यघटनेचा आढावा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

भारतीय राज्यघटनेच्या 'सरनाम्याचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन राज्यशास्त्र विभागातील प्रशिक्षणार्थींनी केले.

2/12/18

Scanned by CamScanner

# सुवर्ण महोत्सवी राजे रामराव महाविद्यालय : एक दृष्टीक्षेप



सन १९६८ चा जून महिना. स्वातंत्र्य मिळूनही दोन दशके उलटून गेलेली. एकदोन वेळा नाही तब्बल चार वेळा सार्वत्रिक निवडणूक झालेल्या. अंक मोजणीतही तळाला असणारा २८८(दोनशे अठ्यांशी) क्रमांकाचा तालुका तथा मतदार संघ, संस्थाने विलीनीकरणांचा रोष धरून सत्ताधारी काँग्रेसची सवतीच्या पोरावरची नजर. दुष्काळाने गावेच्या गावे आठ दहा महिने नदीकाठी स्थलांतरित होण्याची दुर्दैवी परंपरा. अशा स्थितीत दोनवेळच्या भुकेची भ्रांत असणाऱ्या जनतेला शिक्षणाची भूक लागण्याची यत्किंचितही शक्यता नव्हती.एकेकाळी संस्थानाचा दरारा असणाऱ्या या भागाची अवस्था स्वातंत्र्यानंतरच्या दोन दशकानंतर अशी असेल तर त्या राजाला झोप कशी येईल? नाही म्हणायला चार दोन तरुण पुण्या मुंबईला शिकण्यासाठी जातही होते पण सामान्यांच काय? वाचकहो! हि सगळी अवस्था होती जत या डफळे घराण्यातल्या संस्थानच्या प्रदेशाची. राजेशाही खालसा होऊन लोकशाही अस्थितवात आलेली असली तर प्रजेला राजाचा आशीर्वाद आणि राजाला प्रजेची चिंता सुटणारी नव्हती. डफळे घराण्याचे वारसदार जत संस्थानचे अधिपती श्रीमंत विजयसिंहराजे डफळे आणि विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या एका चिंतन भेटीतून जत मध्ये उच्च शिक्षणाची सोय निर्माण करण्याची संकल्पना रुजली. यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली. याचे अध्यक्षपद स्वतः विजयसिंहराजे डफळे यांच्याकडे होते. उपाध्यक्ष पदावर अजितसिंहराजे व उदयसिंहराजे यांची नावे होती तर या समितीचे सेक्रेटरी म्हणून रामराव विद्यामंदिरचे माजी प्राचार्य पांडुरंग नारायण व्हनमाने यांनी काम पाहिले. राज्यशासन आणि शिवाजी विद्यापीठ यांची रीतसर मान्यता मिळून जून १९६९ च्या महिन्यात महाविद्यालय चालू झाले.

यासाठी पुन्हा जागेचा प्रश्न आला. श्रीमंत विजयसिंहराजेंनी स्वतःकडे असणारी जागाच नव्हे तर राजवाड्याच्या उत्तरेला असणारी सुमारे २० ते २५ खोल्या होतील इतकी इमारत देऊ केली. संस्थेने आर. एम.चिटणीस नावाच्या एका विद्वान माणसांची प्रचार्यपदावर नेमणूक केली. सर्व जत शहरातून राजवाड्यावर नवीन महाविद्यालय चालू झाल्याची बातमी पसरली. त्यावेळची मॅट्रिक पास झालेल्या अनेकांनी प्रवेशाचे अर्ज भरून प्रवेश घेतले. कला आणि वाणिज्य या दोनच विद्याशाखाना प्रवेश दिला जात होता. कला शाखेकडे सुमारे पन्नास तर वाणिज्य शाखेकडे वीस अशा सत्तर एक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. वाणिज्य शाखेकडे एकमेव विद्यार्थ्यांनी होती आणि ती म्हणजे श्रीमंत विजयसिंह महाराजांची पुतणी.कला शाखेकडे मात्र २० ते २२ मुलीनी प्रवेश घेतल्याची माहिती मिळते. पहिल्याच वर्षी इतक्या मोठ्या प्रमाणात मुली कशा काय महाविद्यालयात आल्या? असा प्रश्न जेव्हा या काळात शिकणाऱ्या हेमलता उटगिकर यांना विचारला तेव्हा त्या म्हणाल्या उच्च शिक्षणाची सोय नाही म्हणून लग्न जमेपर्यंत घरात बसून असणाऱ्या तीन चार वर्षांपूर्वी मॅट्रिक झालेल्या अनेकजणी पुन्हा कॉलेजमध्ये येवु लागल्या होत्या.प्राचार्य, विद्यार्थी विद्यार्थिनी आणि जागा इमारातीसह मिळाली. प्रत्यक्ष महाविद्यालयाचा दिवस उजाडला पण वर्गावर जायला कोण होतं? याच उत्तर आम्ही पांडुरंग व्हनमाने सरांना विचारले. ते म्हणाले, प्राचार्य चिटणीस आणि मी असे दोघेच पहिल्या दिवशी महाविद्यालयात होतो. इमारतीच्या मध्यवर्ती खोलीत प्राचार्यांचे दालन तयार केले होते. शेजारी कार्यालयाची खोली व इतर वर्ग तीन चार वर्गखोल्या तयार होत्या. हिन्दी प्राच्यविद्या पंडित असणाऱ्या श्री पांडुरंग व्हनमाणे सरांनी या महाविद्यालयाच्या पहिला अध्यापनाचा तास घेतला आणि खऱ्या अर्थाने जतच्या वैभवात उच्च शिक्षणाने श्वास घेतला. या उच्च शिक्षणाला आज पन्नास वर्षे झालेत यावर दस्तूरखुद्द व्हनमाने सरांचाच विश्वास बसत नव्हता.राजे रामरावच्या प्राचार्यांत शामराव चव्हाण सरांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. क्रिडा क्षेत्रात राज्य व देश पातळीवर नावलौकिक मिळवुन देण्यात शामराव चव्हाणाचे योगदान महत्वाचे होते.१९८५ च्या जुन महिन्यात भगवानराव बाबर नावाचे प्राचार्य रुजू झाले. उंचा- पुरा देह, करारी चेहरा, चेहऱ्यावर भरदाव पांढऱ्या शुभ्र पिळदार मिशा. पाहताक्षणी उरात धडकी भरावी असे व्यक्तिमत्व. बाबर सर इंग्रजी विषयाची सुट्टीत जादा तास घायचे. यासाठी त्यांनी जतमधल्या सर्वांना मोफत प्रवेश दिला होता. आम्ही बारावीला जरी रामराव विद्यामंदिरला शिकत असलो तरी रविवारी किव्हा दिवाळी उन्हाळी सुट्टीत बाबर सरांच्या जादा तासाला जायचो. इंग्रजी व्याकरण शिकवण्याची पद्धत मला फार आवडायची. ते मातृभक्त म्हणून ओळखले गेले. वृद्ध आईला सोबत घेऊन ते महाविद्यालयातच मुक्कामी राहायचे. मुळचे तासगावचे आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक असणाऱ्या पोपटराव चव्हाणांनी

संकेत टाइम्स शुक्रवार दि. 2 नोव्हेंबर 2018

3/11/18

1/11/2018

तरुण भारत

# वाचन कट्टा वाचनाची गोडी लावणारा उपक्रम : डॉ. ढेकळे

**जत :** आज विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचा व्यासंग कमी होत आहे. वाचन कट्ट्ययासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण होईल असे प्रतिपादन राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी मराठी विभागाने आयोजित केलेल्या वाचन कट्ट्याच्या उद्घाटन प्रसंगी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, वॉट्स्प, फेसबुक, टीव्ही सारख्या माध्यमांचा प्रभाव विद्यार्थ्यांवर वाढत असल्यामुळे त्यांच्यातील वाचन प्रवृत्ती कमी होत आहे. वाचन कट्टयामुळे विद्यार्थ्यांत मनोरंजनाबरोबर ज्ञानात भर पडेल, ज्ञान लालसा वाढेल. विद्यार्थ्यांनी साहित्याच्या वाचना बरोबरच इतर विषयाचे चौफेर वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी. हे घेतलेले ज्ञान आयुष्यभर उपयोगी पडेल असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. वाचनाने माणूस समृध्द होतो यामुळे आयुष्यात वाचन हे महत्वाचे आहे. आणि उत्तम जीवनासाठी वाचन आवश्यक आहे. मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. एन. व्ही. मोरे यांनी वाचन कट्टयाच्या हेतू सांगितला. यावेळी प्रा. हिरामण टोंगारे, प्रा. अशोक बोगुलवार, प्रा. सतीश पडोळकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. दिनकर कुटे यांनी केले तर आभार प्रा. सुरेखा व्हनमाने यांनी केले.

2/11/18

Scanned by CamScanner

लोकमत सांगली, गुरुवार, दि. २७ डिसेंबर २०१८

# राजे रामराव महाविद्यालयात होणार आंतरराष्ट्रीय परिषद

## तयारी पूर्ण : आजपासून तीन दिवस आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

बिळूर : जत येथील राजे रामराव महाविद्यालयात दि. २७, २८ व २९ डिसेंबर रोजी तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. डॉ. संजय लठ्ठे व प्रा. डॉ. आप्पासाहेब भोसले यांनी केले आहे.

'ॲडव्हान्सेस इन मटेरियल सायन्स' या विषयावर पदार्थविज्ञान विभागातर्फे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेस बांग्लादेश येथील कतार युनिव्हर्सिटी कतार येथील प्रा. डॉ. अबूबक्र अब्दुल्ला यांच्यासह त्यांचे पाच सहकारी संशोधक, तसेच आफ्रिकेतील म्युनिआ कोनाक्रे येथील हायर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऑफ ममाऊ येथील प्रा. हब्बा पॉल व झाम्बिया येथील 'युनिव्हर्सिटी ऑफ झाम्बिया'चे प्रा. इब्रिमा डारबो, नेपाळमधील त्रिभुवन युनिव्हर्सिटी, कीतीर्पूर येथील प्रा. प्रवीण शर्मा सहभागी होणार आहेत.

विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यामध्ये संशोधनाचे आदान-प्रदान व्हावे, हा या आंतरराष्ट्रीय परिषदेमागील हेतू आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये राजे रामराव महाविद्यालय व केमिकल इंजनिअरिंग होवान विद्यापीठ (चीन ) यांच्यामध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार होणार आहे.

पदार्थविज्ञान विषयाच्या संशोधकांनी या परिषदेत आपले संशोधनपर निबंध पाठवावेत व आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी केले आहे.

### परदेशी तज्ज्ञांची उपस्थिती

यापूर्वी २०१६ मध्ये जपान येथील टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आला होता. या आंतरराष्ट्रीय परिषदेस तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉग्यूक विद्यापीठ साऊथ कोरिया, युनिव्हर्सिटी ऑफ टॉरिओ इटली, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, पुणे विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मुंबई येथील तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

Scanned by CamScanner